दिव्यांग विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११४/विशि-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई : ४०००३२.
दिनांक : २२ डिसेंबर, २०२३.

**प्रस्तावना :-**

दिव्यांग विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन यासंदर्भातील आवश्यक विशिष्ट पद्धती, सोयीसुविधा विचारात घेऊन त्यांच्या उच्च शिक्षणामध्ये सुलभता आणण्यासाठी तसेच यासंदर्भातील धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यांचे शिक्षण परिणामकारकरित्या पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांनी मांडलेली स्वतंत्र दिव्यांग विद्यापीठाची आवश्यकता विचारात घेऊन यासंदर्भात तज्ज्ञांची समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यात दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने खालील तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. मुरलीधर चांदेकर, माजी कुलगुरू | अध्यक्ष |
| २ | श्रीमती नसीमताई हूरजुक, प्रेसिडेंट, साहस डिसअॅबिलीटी रिसर्च अॅण्ड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर | सदस्य |
| ३ | श्री. तुषार देशमुख, कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | सदस्य |
| ४ | श्रीमती वर्षा गट्टू | सदस्य |
| ५ | कर्नल बिजूर | सदस्य |
| ६ | श्रीमती रुबीना पाल | सदस्य |
| ७ | डॉ. दिपक भगवान खरात | सदस्य |
| ८ | श्री. विजय कान्हेकर | सदस्य |
| ९ | श्री. दिपक धोटे | सदस्य |
| १० | श्री. यजुर्वेंद्र महाजन | सदस्य |
| ११ | श्री. मुरलीधर कचरे | सदस्य |
| १२ | भारतीय पुर्नवसन परिषदेचा प्रतिनिधी | सदस्य |
| १३ | सहसंचालक, तंत्र शिक्षण, पुणे | सदस्य |
| १४ | विधी अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | सदस्य |
| १५ | सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य सचिव |

**<u>समितीची कार्यकक्षा:-</u>**

१. दिव्यांग विद्यार्थी संपूर्ण राज्यात विखुरलेले असून, विविध प्रकारच्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित आहेत. व सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबत शिक्षण घेत आहेत. अशा परिस्थितीत एकल स्वरुपाच्या स्वतंत्र दिव्यांग विद्यापीठाची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत सविस्तर तपशीलासह शासनास शिफारस करणे.

२. दिव्यांग विद्यापीठ स्थापन करावयाचे झाल्यास त्याचे स्थान, आवश्यक जमीन, बांधकाम, जागेची आवश्यकता इत्यादी बाबी विचारात घेऊन शिफारस करणे.

३. विद्यापीठ स्थापनेच्या अनुषंगाने खर्चाचा अंदाज, अध्यापक, अध्यापकेत्तर कर्मचारी किती असावेत, राज्यावर किती आर्थिक भार पडणार आहे, यासंदर्भात तपशीलवार माहितीसह शिफारस करणे.

४. विद्यापीठ स्थापन करताना संभाव्य अनावर्ती, आवर्ती खर्च इ. बाबींचा तपशील.

५. विद्यापीठाचे विविध विभाग व विद्यापीठाची सर्वसाधारण रचना याबाबतचा सविस्तर आराखडा.

६. The Rights of Persons with Disabilities Act, 2016 व अधिनियमातील Inclusive Education (सर्व समावेशित शिक्षण) ही संकल्पना विचारात घेता, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केल्यास त्यांना सर्वसामान्य मुलांबरोबर समान शिक्षण घेता येणार नाही. तसेच, दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये वेगळेपणाची भावना वाढीस लागण्याची शक्यता याबाबींचा सखोल अभ्यास करून शिफारशी करणे.

७. विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच रोजगाराच्या संधी कशा प्रकारे उपलब्ध होतील, याबाबत शिफारस करणे.

८. स्वतंत्र विद्यापीठाऐवजी पारंपारिक विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विभाग केंद्र स्थापन केल्याने गुणात्मक पडणाऱ्या फरकाची तुलनात्मक माहिती सादर करणे.

९. विद्यापीठाचे स्वरुप एकल असेल की, इतर महाविद्यालयांचे संलग्नीकरण असेल याबाबत सर्व बाबी विचारात घेऊन शिफारस करणे.

१०. इतर राज्यात दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ झाले असेल तर त्या विद्यापीठ कामगिरीचा अभ्यास करुन दिव्यांग विद्यापीठासाठी आवश्यक बाबी आणि येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना सूचविणे.

११. प्रस्तावित विद्यापीठात शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम केंद्र शासनाच्या / विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत करण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे.

१२. दिव्यांग विद्यार्थ्यांची वर्गवारी निश्चित करुन त्यासाठीचे अभ्यासक्रम, विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकष यासंदर्भात अभ्यास करुन सविस्तर शिफारशी करणे.

१३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये बहुविद्याशाखीय शिक्षण व संशोधन केंद्रित विद्यापीठासंदर्भात करण्यात आलेली शिफारस विचारात घेता, केवळ दिव्यांगासाठी विद्यापीठ स्थापन करता येईल किंवा कसे? असल्यास, सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित करावयाचे संशोधन कार्यक्रम, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम व अध्यापन पद्धतीबाबत सविस्तर तपशीलासह शिफारस करणे.

उपरोक्त कार्यकक्षेतील मुद्दे तसेच विद्यापीठ स्थापनेसाठी योग्य वाटतील अशा बाबींसाठी विविध तज्ञ व्यक्ती आणि संस्था यांचेशी विचारविनिमय करुन सर्व समावेशक सविस्तर तपशीलासह समिती दोन महिन्यांत शासनास अहवाल सादर करील.

सदर समितीतील अशासकीय सदस्यांना प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. त्याबाबतची तरतुद सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयीन खर्चासाठीच्या उपलब्ध निधीतून करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१२२२१५५६२७०९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT
MADHUKARRAO
BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.12.22 15:56:09 +05'30'

**(अजित बाविस्कर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल कार्यालयाचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उपमुख्यमंत्री(गृह) कार्यालयाचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उपमुख्यमंत्री(वित्त) कार्यालयाचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाज़गी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६. श्री. मुरलीधर चांदेकर, माजी कुलगुरू, समितीचे अध्यक्ष.
७. श्रीमती नसीमताई हूरजुक, प्रेसिडेंट, साहस डिसअ‍ॅबिलीटी रिसर्च अ‍ॅण्ड केअर फाऊंडेशन, कोल्हापूर.
८. श्री. तुषार देशमुख, कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, सदस्य.
९. श्री. दिपक धोटे, सदस्य.
१०. श्रीमती वर्षा गट्टू, सदस्य.
११. कर्नल बिजूर, सदस्य.
१२. श्रीमती रुबीना पाल, सदस्य.
१३. डॉ. दिपक भगवान खरात, सदस्य.
१४. श्री. विजय कान्हेकर, सदस्य.
१५. श्री. यजुर्वेंद्र महाजन सदस्य
१६. श्री. मुरलीधर कचरे, सदस्य.
१७. संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचे कार्यालय, सदस्य.
१८. विधी अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, सदस्य
१९. भारतीय पुर्नवसन परिषदेचा प्रतिनिधी, सदस्य.
२०. सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे, सदस्य सचिव.
२१. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२२. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२३. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालय, सदस्य सचिव.
२४. निवडनस्ती(विशि-४).